छात्र प्रबोधन

सौर श्रावण, शके १९४२ । वर्ष २० अंक ११।
(प्रारंभापासूनचा अंक क्रमांक – वर्ष २९ अंक १)
वार्षिक वर्गणी ₹ २००। मूल्य ₹ २०। पृष्ठे २०

ज्ञान प्रबोधिनीचे कुमारांसाठी,
कृतिशीलता जोपासणारे मासिक!



तनूमनात...

तनूमनात एक ध्यान प्रिय महान हिंदुस्थान
हिंदुस्थान हिंदुस्थान हिंदुस्थान हिंदुस्थान ।। धृ. ।।

ऋषी मुनी तपोनिधी कितीक येथ जाहले
दिव्यदृष्टि-चिंतकांनी विश्वगूढ भेदिले
गुरुपदीच शोभतो प्रिय महान हिंदुस्थान ।। १ ।।

जाहली प्रसन्न येथ जान्हवी भगीरथा
सिद्ध सूर्य कोंडण्यास ब्रह्मपुत्र सर्वथा
यत्न हाच मंत्र देइ प्रिय महान हिंदुस्थान ।। २ ।।

सरेल दैन्य येथले सुबुद्ध कष्ट सिंचता
बहरतील वैभवे ध्यासबीज पेरता
शतयुगे अदीन हा प्रिय महान हिंदुस्थान ।। ३ ।।

असंख्य ज्योति चेतवून एक आरती तुझी
असंख्य सूर मेळवून एक अर्चना तुझी
हृदयपुष्प वाहिले पदी तुझ्याच हे महान ।। ४ ।।

– हेमा अंतरकर

या पद्याची चाल ऐका आणि पद्य म्हणा!

पद्याचा भावार्थ : या पद्यात आपल्या देशाबद्दलची काही स्वप्नं रंगवली आहेत. मात्र, ती केवळ सदिच्छेनं प्रत्यक्षात येणार नाहीत. त्यासाठी विशिष्ट ध्येय डोळ्यासमोर ठेवून, त्या ध्येयाचा पाठपुरावा करण्यासाठी सतत चिकाटीनं, एकजुटीनं परिश्रम करावे लागतील; याचंही भान पद्यात व्यक्त झालं आहे.

आपला भारत विश्वगुरू व्हावा, अशी मनीषा स्वामी विवेकानंदांनी व्यक्त केली होती. हे स्वप्न प्रत्यक्षात येण्यासाठी आवश्यक ती आध्यात्मिक परंपरा आपल्या देशापाशी आहे. पण जगानं आपल्या देशाबद्दल गुरूप्रमाणे श्रद्धा बाळगण्यासाठी आपल्या तत्त्ववेत्त्यांना, साधकांना केवढा विश्वास इतर देशांना द्यावा लागेल! ब्रिटन, चीन यांच्यासारख्या देशांनी आपापल्या विचारपंथाचा पुरस्कार करण्यासाठी अनेक मार्ग वापरले. आपल्याला यापेक्षा काही वेगळा, अधिक श्रेयस्कर मार्ग चोखाळता येईल का?

भारताचा उल्लेख या पद्यात हिंदुस्थान असा केला आहे. देश खऱ्या अर्थानं हिंदुस्थान व्हावा, म्हणूनही प्रयत्न आवश्यक आहेत. सहिष्णुता आणि सर्वांप्रती समभाव ही हिंदू धर्माचरणाची महत्त्वाची वैशिष्ट्यं. अनेक महापुरुषांनी आणि साधुसंतांनी ही तत्त्वं आचरणात आणून दाखवली आहेत. सर्वच धर्म आणि पंथ यांनी ती अंगिकारली तर एक आदर्श देशच काय, नवी विश्वरचनाच साकार होईल.

छात्र प्रबोधन

सौर श्रावण, शके १९४२। वर्ष २० अंक ११
(मासिकाचा प्रारंभ : सौर श्रावण शके १९१४/ऑगस्ट १९९२
एकूणात ३३७ वा अंक, वर्ष २९ अंक १)
प्रकाशन दिनांक – सौर २९ श्रावण, शके १९४२/२० ऑगस्ट २०२०

ॐ

इवली शल्ये रुपती खुपती
मात करू दे त्यांच्यावरती
प्रगल्भतेचे पंख देऊनी
ने ज्योतिर्जगतात

संपादक, प्रकाशक, मुद्रक
महेन्द्र सेठिया

मानद संपादक : शैलजा देशमुख

संपादक मंडळ
वाच. कांचनगंगा गंधे
नीलिमा करमरकर, आश्लेषा महाजन

कार्यकारी संपादक
शिल्पा कुलकर्णी

साहाय्यक कार्यकारी संपादक
अनादि ढवळे

मुखपृष्ठ व आतील चित्रे
राहुल देशपांडे

संपर्क पत्ता
छात्र प्रबोधन, ज्ञान प्रबोधिनी
५१०, सदाशिव पेठ, पुणे 411030
☎ (०२०) २४२०७१७४/१७५

छात्र प्रबोधन मासिकाची वर्गणी
वार्षिक : ₹ २०० द्वैवार्षिक : ₹ ४००
त्रैवार्षिक : ₹ ५५० दशवार्षिक : ₹ १७००
इ – मासिकाची वर्गणी – ₹ १००/–

या अंकाची किंमत : ₹ २०/–
घरपोच दिवाळी अंकासाठी प्रतिवर्षी ₹ ५० जादा
चेक/डी.डी. '**ज्ञान प्रबोधिनी**' अथवा
'**Jnana Prabodhini**' याच नावाने काढावा.

NEFT साठी बँकेचे तपशील पुढीलप्रमाणे –
Account Name - Jnana Prabodhini
Bank Name - Bank Of India
Account No.- 051510110004917
Branch - Shanipar, Pune
IFSC Code - BKID0000515
ऑनलाईन वर्गणी भरल्यावर 'छात्र प्रबोधन'ला मेल करून त्याचे तपशील कळवा.

अंतरंग

४. कथा... **आगळी-वेगळी बँक*** – सुनीला गोंधळेकर
७. कविता... **मनातले खेडे*** – चिंतामणी जोगळेकर
८. कृतिपर... **बहुपयोगी डबा*** – ज्ञानेश्वरी बेडेकर
९. माहितीपर... **गोष्ट अवकाश स्थानकाची*** – डॉ. मेघाश्री दळवी
१२. स्फुटं... **माहीत आहे का?** – वाच. कांचनगंगा गंधे
१४. ललित... **जाळ्यातून सुटायचं का?*** – आदित्य महाजन
मुखपृष्ठाच्या आतील पद्य... **तनूमनात...** * – हेमा अंतरकर

याशिवाय : हसा हसा हसा...(११), स्वयंशोध चाचणी, प्रतिसादी वाचकवीर व्हा...(१८)

संवाद

प्रिय प्रबोधकांनो,

लॉकडाऊन नंतर हळूहळू सर्व व्यवहार आता सुरळीत होण्यास सुरुवात झाली आहे. गेले सहा महिने करोना महामारीमुळे जणू सर्वांच्या स्वातंत्र्यावर काही प्रमाणात निर्बंध आले होते. एरवी ज्या स्वाभाविकपणे, आपण सहजच जे सर्व व्यवहार करू शकत होतो, आपल्याला विविध सेवा-सुविधा उपलब्ध होत्या; त्या सगळ्यांवर एकदम बंधन आलं होतं. या काळात सण, उत्सव साजरे करण्याच्या पद्धती बदलल्या. ज्यांचे आर्थिक कमाईचे मार्ग बंद झाले होते त्यांना आपल्या घासातला घास काढून देणारी मंडळी तुम्ही पाहिली असतील! दरम्यान कुठल्या गोष्टी या 'आवश्यक' यादीत येतात आणि कुठल्या 'चैनी'च्या यादीत मोडतात याचाही तुम्हाला नव्याने साक्षात्कार झाला असेल!

या सर्व परीक्षेच्या आणि आव्हानात्मक काळात 'स्वातंत्र्या'चा अर्थ आणि महत्त्व काय असतं, ते तुम्हाला नव्याने उमगलं असेल... त्यामुळे सर्वच बाबतीत, सर्व आघाड्यांवर 'आपसूक' मिळालेल्या स्वातंत्र्याचा आगामी काळात योग्य पद्धतीने, डोळसपणे, जबाबदारीने आणि विधायक वापर करू या.

स्वातंत्र्यदिनाच्या निमित्ताने आपल्या देशाला स्वातंत्र्य मिळवून देण्यासाठी ज्यांनी बलिदान दिले, त्या सर्वांचे स्मरण करत त्यांनी सुचवलेल्या मार्गावर चालायचा प्रयत्न करू या!

स्वातंत्र्यदिनाच्या तुम्हाला अनेक शुभेच्छा!!

तुमची,
शिल्पाताई

या नियतकालिकास महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळाकडून अनुदानापोटी काही रक्कम प्राप्त झाली आहे.
परंतु या नियतकालिकात प्रसिद्ध झालेली मते महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळास मान्य असतीलच असे नाही.

आगळी-वेगळी बँक

– सुनीला गोंधळेकर

प्रस्तुत कथा कशी सुचली आणि आगळीवेगळी बँक कोणती हे जाणून घेण्यासाठी ऐका लेखिकेचे विचार आणि मग वाचा सोबतची कथा!

बाबा नेहमीप्रमाणे बँकेत आणि आई पण ऑफिसला गेली. समृद्धीला मात्र मैत्रिणीकडे जायला आईने अगदी नकार दिला. वर म्हणाली ''भटकभवानीपणा करू नकोस. जरा घरी थांबून अभ्यास कर.'' त्यामुळे आज अपूर्व आणि समृद्धी अगदी गप्प बसले होते. आजीला आणि आजोबांना आश्चर्य वाटलं. ओळखीच्या काकूंना बरं नव्हतं म्हणून भेटायला गेलेले आजी आणि आजोबा दुपारी उन्हं कमी झाल्यावर घरी परतले. तर काय, घरात एकदम चिडीचूप्प! आजी दारातच आजोबांना म्हणाली, ''उन्हाची कुठे गेली ही पोरं?''

''अगं, खेळायला गेली असतील. त्यांना कसलं आलंय ऊन आणि सावली. त्यांना जरा 'पडे झडे त्याचे दोन दोन वाडे,' हे पाहू देत ना.''

आजोबांचा आवाज ऐकताच अपूर्व बाहेर आला, ''आजोबा, दोन वडे? तुम्ही वडा आणलाय का?'' आजोबा म्हणाले, ''अरे वडे नाही, वाडे म्हणालो मी. लहानपणी खेळताना जे पडतात, ज्यांना लागतं, त्यांना पुढे आयुष्यात मोठे-मोठे वाडे मिळतात.'' ''वाडे? म्हणजे काय असतं हो आजोबा?'' अपूर्वने त्याची शंका विचारली. ''वाडा म्हणजे ...म्हणजे मोठ्ठी घरं मिळतात.'' डोळे विस्फारत अपूर्वने विचारलं, ''खरंच आजोबा?'' समृद्धीसुद्धा बारीक आवाजात म्हणाली, ''पण म्हणजे वडे नाहीतच ना. मग काय उपयोग आहे?''

''अगं, आम्ही काकूंना भेटायला गेलो होतो. मग वडे कुठून आणणार?''

''तू आणि आजोबा काल कुठे गेला होतात गं?''

''काल... काल घरीच तर होतो की,'' आजी म्हणाली. ''अहो, घरी कुठे? काल तुम्ही संध्याकाळी फिरून येताना आपल्याकडे झाडायला सोमू येतो, त्याच्या घरी नव्हता का गेलोत?'' आजोबा म्हणाले.

''हे बरं तुमच्या लक्षात राहिलं आहे. गेले होते हो सोमूकडे. तुम्ही सांगा, जायला नको का? अहो, त्याची बायको बाळंतीण आहे. घरी इतर कोणी बाईमाणूस नाही तिच्या. म्हणून थोडे लाडू घेऊन गेले होते तिच्यासाठी,'' आजीचं स्पष्टीकरण.

''ते काही असेल. पण

जरूर भेट द्या : मोरेश्वर - मोरगाव, जि. पुणे - काळ्या दगडापासून बांधलेले मशिदीसारख्या आकाराचे मंदिर.

वार्षिक प्रायोजक – • श्रीमती लीला आचवल, नाशिक • सौ. उषा पुरंदरे, पुणे • सौ. नंदिता सदाशिव वझे, पुणे • श्री. रवी बांडे, शिवापूर, पुणे • एक हितचिंतक, पुणे

गेला होतात ना,'' आजोबांनी आपला मुद्दा पुढे रेटला.
''होय हो. गेले होते मी. आता झालं का समाधान? पण काय हो, तुम्ही काल दुपारी 'पलीकडल्या दुकानात जातो,' म्हणून गेलात आणि किती वेळ तिकडेच होतात. त्याबद्दल बोला की. मी गेले की दिसतं तुम्हाला... पण तुमचं काय?'' आजीनं दटावलं.

''अगं हो हो हो. मी दुकानात गेलो होतो. तिथे पोस्टमनकाका भेटले. म्हणून चार शब्द बोललो त्यांच्याशी. तर म्हणाले, चहाची वेळ झालीच आहे. चला घरी. मन मोडवेना त्यांचं.''

''घरी दोन मिनिटं बोलत बसा म्हटलं तर वेळ नसतो अगदी,'' आजी म्हणाली.

''तसं नाही गं. तू पराचा कावळा करू नकोस. आणि खरं सांगू का, मागच्या आठवड्यात त्यांनी थोडे पैसे मागितले होते. पेन्शन यायची होती. त्यामुळे तेव्हा नव्हते माझ्याकडे पैसे. मग म्हटलं, आता आहेत कनवटीला चार पैसे तर चहा प्यायच्या निमित्ताने जावं आणि द्यावेत.''

''असं होय. मला बोलला नाहीत हे,'' आजी म्हणाली.

''ते जाऊ दे. वडे आणलेत का ते सांगा?'' अपूर्व म्हणाला. आजोबांना हसू आलं.
''तुमची गाडी अजून वड्यावरच अडलेली आहे वाटतं. आज नाही जमलं; पण उद्या येताना वडे नक्की आणणार. आता खूश?'' आजोबांचं हे वाक्य पूर्ण होण्याच्या आत आजी म्हणाली, ''विकत कशाला आणायला हवेत वडे? मी मस्तपैकी घरी करते. तू आणि समृद्धी मला मदत करा. विकतचं जिभेला पुरत नाही हो. घरंच कसं पोटाला होतं.''

''उद्या संध्याकाळी आपल्याला आनंदरावांनी बोलावलं आहे. तिकडे जायला हवं. त्यामुळे ते वडे आजच करा. उद्याला नको बरं.'' आजोबांनी सांगितलं.
''चालेल. चालेल. मी बटाटे सोलून देतो.'' अपूर्वला उत्साह आला. ''आणि समृद्धी काय करणार?''
''ए. मला अजिबात वेळ नाही आत्ता. मी चालले चैत्रालीकडे. आजी-आजोबा रोज तर जातात कुणाकुणाकडे आणि आम्ही गेलो की मात्र भटकभवानी..'' समृद्धीला चांगलाच राग आला होता.

''अगं, आनंदरावांचे वडील आजारी असतात. कधीकधी फारच चिडचिड करायला लागले, डॉक्टरांनी सांगितलेलं पथ्य पाळेनासे झाले की,

ऐकत नाहीत गं ते कुणाचं. मग आनंदराव आम्हाला 'या' म्हणतात. तुम्ही सांगितलं की ऐकतील म्हणतात. मग जातो आम्ही,'' आजोबांनी कारण सांगितलं.

''का त्यांना आणखी मित्र-नातेवाईक नाहीत का? तुमचं कशाला ऐकतील ते.''

''त्याची एक गंमत आहे बरं,'' आजी सांगायला लागली. ''मागे खूप वर्षांपूर्वी त्यांना कावीळ झाली होती. यांच्या माहितीतले एक वैद्य त्यावर रामबाण औषध देतात. म्हणून रोजच्या औषधासाठी दहा किलोमीटर सायकलवरून जायचे हे. त्या औषधाने आनंदरावांचे वडील बरे झाले. तेव्हापासून यांना फार मानतात ते.''

''आजी- आजोबा, तुम्हाला मानणारे खूप लोक आहेत ना?'' अपूर्वने विचारलं.

''आहेत आपली थोडी माणसं.'' आजोबा हळू आवाजात उत्तरले.

''म्हणजे? तुम्ही पूर्वीपासूनच असे सारखे फिरत असायाचात का? मला आई भटकभवानी म्हणते तसं?'' समृद्धीचा राग काही कमी झाला नव्हता.

बाबा बँकेतून परत आला आणि घरात शिरतानाच त्यानं समृद्धीचा प्रश्न ऐकला. ''अगं, चिडू नको अशी. आजी-आजोबांची बँक आहे स्वतःची!''

समृद्धी आणि अपूर्वला बाबाच्या बोलण्याचा अर्थच कळेना.

''पण आजोबा तर शिक्षक होते आणि आजी कधी कामाला गेली नाही. मग त्यांची बँक? ती कशी काय?'' अपूर्वने विचारलं. बाबांच्या चेहऱ्यावर या प्रश्नामुळे हसू आलं. ते म्हणाले, ''अरे, मी काम करतो तशी पैशांची बँक नाही. ही वेगळीच बँक आहे. 'माणसांची बँक'. आजी-आजोबांनी या बँकेत माणसं साठवली आहेत. आणि त्या माणसांचा गोडवा चक्रवाढ व्याजासारखा वाढत असतो. म्हणून तर आपल्याकडे काहीही लागलं की त्यांचे नातेवाईक, मित्रमैत्रिणी, ओळखीचे कोण-कोण कुठून-कुठून येतात.''

''हो, हो. मला आठवलं आता. मला शाळेत दागिन्यांवर *प्रोजेक्ट* करायचा होता, तेव्हा दागिने घडवणाऱ्या पेढीत अगदी आतल्या खास दुकानात घेऊन गेले होते आजोबांचे मित्र. त्यामुळे माझा *प्रोजेक्ट* सगळ्यात बेस्ट झाला होता,'' समृद्धी म्हणाली.

''मला पहाटे किंवा अपरात्री विमानतळावर जायला लागतं, तेव्हा जे रिक्षावाले काका न चुकता येतात ते आजीमुळे बरं! त्यांच्या बँकेत अनेक वर्षांपासून माणसांची माया जमा केलेली आहे. त्या बँकेची श्रीमंती सतत वाढत असते. आमच्या पैशाच्या बँकेसारखे त्यात चढउतार नसतात. माणसं जोडणारी बँक सतत दुप्पट व्याज देते बरं का.'' आता समृद्धी विचार करायला लागली. तिला कळालं की, आपण नुसत्याच गप्पा मारायला मैत्रिणीकडे जातो आणि आपल्याला मदत पाहिजे, तेव्हा काही मैत्रीण येतेच असं नाही. आजी-आजोबा माणसांची रुजवण आणि साठवण करत असतात. आपणही काहीतरी वेगळं केलं पाहिजे, असं तिला मनापासून वाटलं.

''मी सुद्धा आता माझी बँक तयार करणार आहे.'' समृद्धी एकदम म्हणाली.

''कशाची? कानातल्यांची का गळ्यातल्यांची?'' अपूर्वने तिला चिडवण्याची संधी सोडली नाही.

''स्मित हास्याची बँक.'' समृद्धीने टेचात उत्तर दिलं.

●●●

- सुनीला गोंधळेकर
श्री बंगला, तुकाराम सोसायटी,
अरण्येश्वर, पुणे 411009

जरूर भेट द्या : सिद्धिविनायक - सिद्धटेक, जि. अहमदनगर - उजव्या सोंडेची उत्तराभिमुख स्वयंभू मूर्ती.

वार्षिक प्रायोजक - • **श्री. प्रमोद वासुदेव जोशी, पुणे** • **असेंट हॉस्पिटॅलिटी प्रा. लि., पुणे,** ९८६०४०४९९०, • **बडवे इंजिनियर्स, प्रा. लि., पुणे** • **श्री. अतुल कुलकर्णी, पुणे** • **एक हितचिंतक, पुणे**

कविता

मनातले खेडे

लहानपणी उन्हाळ्याच्या सुट्टीत कोकणात आजीकडे जाण्याची ओढ लागलेली असायची. उन्हाळ्याच्या सुट्टीत तिथे गेल्यानंतर तिथला निसर्ग, आजीचा पाहुणचार याबद्दलच्या हृद्य आठवणी मनात अत्तराच्या कुपीप्रमाणे जपून ठेवल्या आहेत. शहरात राहताना वाटेल तेव्हा या खेड्यातल्या आठवणींच्या अत्तराची ती कुपी मी उघडतो आणि माझ्या मनातले खेडे परत जागे करतो, त्याला आंजारतो, गोंजारतो, जपतो...

लाल तांबडा रस्ता येथे
वळण वाकडे घेतो
वाडीमधल्या छोट्या माझ्या
घराकडे जो नेतो।।

हिरवाई दोन्ही बाजूंना
आहे छान बहरली
स्वागत करण्या माझे वाटे
सृष्टी सारी नटली।।

झाडावरती फणस लगडले
तिथेच खेळे खार
आंब्यांच्या आढीचा येई
सुंदर मधुर सुवास।।

रातंबीची झाडे सजली
रंग लाल उधळाया
करवंदेही जाळीमधली
म्हणती या ना खाया।।

भुलती भुंगे, जांभुळ पिकले
सडा जांभळा पडतो
रावे येती हिरवे हिरवे
थवा नभी या उडतो।।

कोकणातल्या घरात आजी
वाट सदाची बघते
गेल्यावर ये स्वागतास ती
मोठा थाट उडवते।।

भात गुरगुट्या तेथे मिळतो
रोज सकाळी खाण्या
पोहा पापड सोबत मिळतो
त्याची चव वाढवण्या।।

खिडकीतुन चाळीच्या एका
मनात खेडे बघतो
जरी नांदतो शहरामध्ये
मनात खेडे जपतो

वाचूया
संध्याकाळचं
मनोहारी वर्णन
कवी – बजरंग सरोदे

– चिंतामणी जोगळेकर

यूज अँड थ्रो ग्लासपासून बहुपयोगी डबा

साहित्य – *यूज अँड थ्रो* कागदी ग्लास, जाड पुठ्ठा, *कार्डशीट पेपर*, पोस्टर कलर, ब्रश, कात्री, डिंक, सुशोभनासाठी मणी/लेस इ.

चित्र क्र. १

कृती –

१) *प्रथम यूज अँड थ्रो* कागदी ग्लास पोस्टर कलरने आतून व बाहेरून रंगवून घ्या. (चित्र क्र.२)

२) हे रंगवलेले ग्लास वर्तुळाकार ठेवून त्या आकाराचे वर्तुळ जाड पुठ्ठ्यापासून कापून घ्या.

३) त्या वर्तुळावर *कार्डशीट* कागद सफाईदारपणे चिकटवा. (चित्र क्र.३)

४) तयार झालेल्या वर्तुळावर रंगवलेले *यूज अँड थ्रो* कागदी ग्लास (चित्र क्र.४) प्रमाणे चिकटवा.

५) या ग्लासच्या उंचीची व गोल पुठ्ठ्याच्या आकाराची *कार्डशीट पेपरची* गोल पट्टी कापून पुठ्ठ्यावर चिकटवा. (चित्र क्र.५)

६) चिकटवून झाल्यावर गोल पट्टीला बाहेरून *पोस्टर* कलर वापरून *इयर बड्स* अथवा ब्रशच्या साहाय्याने आपल्या आवडीप्रमाणे नक्षीकाम करा. सुशोभनासाठी मणी, लेस यांचाही कल्पक वापर करू शकता.

७) तयार झालेल्या या डब्यात आपण सुशोभनाच्या वस्तू, रांगोळीचे रंग इ. ठेवू शकतो. या डब्यासाठी एक झाकण तयार केले तर खाद्यपदार्थ ठेवण्यासाठीही याचा उपयोग करता येईल. (चित्र क्र. ६)

– **ज्ञानेश्वरी बेडेकर,** ७४१, धर्मपुरी, वाई

चित्र क्र.२



चित्र क्र.३

चित्र क्र.४

चित्र क्र.५

दिलेल्या कृतीच्याआधारे ही कलाकृती करताना काही अडचण आली तर QR code मध्ये दिलेला व्हिडिओ पाहा.

चित्र क्र.६

जरूर भेट द्या : बल्लाळेश्वर – पाली, जि. रायगड – स्वयंभू मूर्ती, सूर्यकिरणे मूर्तीवर पडतील अशी वैशिष्ट्यपूर्ण मंदिर रचना.

वार्षिक प्रायोजक – • डॉ. कृष्णकांत मानकर, मोशी, पुणे • श्री जगजीत कुलकर्णी, चिंचवड , पुणे • श्री. संतोष साटम, पुणे • श्री. साहिल कोठारी, बारामती • श्री. अमित बागाईतकर, पुणे

गोष्ट अवकाशस्थानकाची

– डॉ. मेघाश्री दळवी

अवकाशात जायचं म्हटलं की, खूप छान वाटतं ना? काळ्याभोर आकाशात चमकणारे ग्रह-तारे आणि आपण ऐटीत आत बसून बाहेरचं दृश्य बघतोय. हो ना? जवळपास तसाच अनुभव येतो तो आंतरराष्ट्रीय अवकाशस्थानकावर (इंटरनॅशनल स्पेस स्टेशन).

नासा (नॅशनल एरॉनॉटिक्स अँड स्पेस ॲडमिनिस्ट्रेशन) ही सुप्रसिद्ध अमेरिकन अवकाश संशोधन संस्था. सोबत रशिया, जपान, कॅनडा, आणि युरोपियन युनियन यांनी मिळून हे स्थानक अवकाशात सोडलं आहे. गेली वीस वर्षं हे स्थानक न थांबता, न थकता पृथ्वीभोवती फिरतं आहे. रशियाचं 'सोयूझ यान' अवकाशवीरांना तिथे घेऊन जाण्याचं आणि परत आणण्याचं काम करतं. आता स्पेस-एक्स या खाजगी अमेरिकन कंपनीचं 'ड्रॅगन यान' हेदेखील यासाठी वापरलं जाणार आहे.

अवकाशात गुरुत्वाकर्षण नसतं. पृथ्वीसारखा वातावरणाचा थर नसतो. या सगळ्याचा परिणाम रसायनं, जिवाणू-विषाणू, वनस्पती, प्राणी, माणूस यांच्यावर होतो. तो कसा होतो, किती होतो, त्यासाठी आपण काय काळजी घ्यायला हवी, त्यासाठी काय उपाय करता येतील, ह्या साऱ्या गोष्टी बऱ्याच महत्त्वाच्या आहेत. अवकाशात खूप दूरवर प्रवास करायच्या आधी आणि मंगळासारख्या ग्रहांवर जाऊन राहायच्या आधी हा सगळा अभ्यास करणं गरजेचं आहे. आणि त्यासाठी आपलं हक्काचं ठिकाण आहे ते आंतरराष्ट्रीय अवकाशस्थानक.

या स्थानकात एका वेळी चार आणि बऱ्याचदा सहापर्यंत अंतराळवीर राहतात. अमेरिका, रशिया, फ्रान्स, इटली, इंग्लंड, स्वीडन, कॅनडा, अशा एकोणीस देशांमधून एकूण दोनशेचाळीस जण तिथे जाऊन आलेले आहेत. सर्वात जास्त काळ स्थानकावर राहाण्याचा विक्रम आहे शास्त्रज्ञ पेगी व्हिटसन यांच्या नावावर. त्या सलग २८८ दिवस आणि एकूण ६६५ दिवस तिथे राहून आलेल्या आहेत. आता त्या निवृत्त झाल्या आहेत, नाहीतर अवकाशस्थानक हे जणू त्यांचं दुसरं घर होतं!

अवकाशात हे स्थानक फिरतं ठेवणं हे मोठं आव्हान असतं. त्यासाठी इंधनदेखील भरपूर लागतं. साहजिकच स्थानकाचा आकार शक्य तितका लहान ठेवावा लागतो. त्या छोट्या जागेत अवकाशवीर दाटीवाटीने राहतात. उरलेल्या भागात त्यांची उपकरणं आणि काही *रोबोट्स* आहेत. अलीकडे तिथे काही माणसासारखे दिसणारे *रोबोट्स* म्हणजे *ह्यूमनॉइड्स* राहात आहेत. नासाचा *रोबोनॉट* २ गेली नऊ वर्षं तिथे वेगवेगळी कामं करतो आहे. कॅनडाचा डेक्स्टर आणि जर्मनीची आइला त्याला मदत करत असतात. नासाच्या https://www.nasa.gov/mission_pages/station/main/index.html या *वेबपेज*वर तुम्हाला अवकाशस्थानकाचे मस्त फोटो आणि *व्हिडिओज* बघता येतील.

हे अवकाशस्थानक पृथ्वीभोवती दिवसातून सुमारे सोळा फेऱ्या घालतं. त्यातल्या काही

वार्षिक प्रायोजक – • श्री. संजीव प्रभाकर करंदीकर, ठाणे • कु. स्पृहा विजय कुलकर्णी, पुणे • श्री. विक्रम कामठे, पुणे • श्री. धनंजय गोखले, पुणे • श्री. मयुरेश सोहोनी, पुणे

फेऱ्या थेट आपल्या घरावरून जातात. दिवसा सूर्यप्रकाशात हे स्थानक दिसू शकणार नाही. मात्र सूर्योदयाच्या आगेमागे आणि सूर्यास्ताच्या जरा नंतर ते आपल्यावरून जात असेल, तर अगदी सहज दिसू शकतं. ती नेमकी वेळ पकडायची असेल तर त्यासाठी एक सोपी *आयडिया* आहे. नासाचं एक *वेबपेज* आहे https://spotthestation.nasa.gov/signup.cfm. इथे आपण *रजिस्टर* केलं, की अवकाशस्थानक आपल्या घरून कधी बघता येईल याच्या इ-मेल्स नासा आपल्याला पाठवत राहते. त्यात कुठच्या दिशेला किती वेळ स्थानकाचा प्रवास आकाशात दिसेल याची पूर्ण माहिती असते. त्यावेळी नीट पाहिलं तर, अवकाशस्थानक वेगाने जाताना दिसतं. विमानं उडतात त्याहून जास्त उंचीवरून हे स्थानक जातं. आणि विमानाच्या तिप्पट वेगाने. मात्र विमानासारखे लुकलुकते दिवे तिथे नसतात. साध्या डोळ्यांनी अवकाशस्थानक व्यवस्थित दिसतं. त्यात तुम्ही एक छोटी दुर्बीण वापरली तर ते आणखी स्पष्ट दिसेल. तेव्हा *रजिस्टर* करून बघायला विसरू नका!

स्थानकावर नेहमी वेगवेगळे प्रयोग सुरू असतात. त्यातले सर्वात महत्त्वाचे असतात ते अवकाशात अन्नधान्य पिकवण्याचे. नेहमीच्या गुरुत्वाकर्षणात मुळं जमिनीत खोल जाऊन पाणी

शोषून घेतात, तर रोपं जमिनीवर वरच्या दिशेने वाढतात. सूर्यप्रकाशाच्या मदतीने पानं अन्न तयार करतात. पृथ्वीवर हे सगळं अतिशय सहज होत असतं. अवकाशात मात्र रोपं वाढवणं हाच एक मोठा प्रयोग असतो. एकीकडे आपण चंद्रावर, मंगळावर जाऊन राहण्याचा विचार करतो आहोत, दुसरीकडे दूरच्या ग्रहमालांकडे प्रवास करण्याच्या योजना बनवतो आहोत. तेव्हा या मोहिमांवर जाणाऱ्या अवकाश प्रवाश्यांच्या खाण्यापिण्याची व्यवस्था तर करायला हवी. म्हणून या प्रयोगांचं महत्त्व.

आतापर्यंत अवकाशस्थानकावर काही फुलं, लेट्यूस, मुळा, कोबी, झुकिनी पिकवून पाहिलेली आहेत. तिथले अवकाशवीर 'आपण स्वत: वाढवलेलं सॅलड खाऊन बघितलं', असं मोठ्या अभिमानाने सांगतात. एरव्ही पृथ्वीवरून पॅकबंद खाणं खाऊन ते कंटाळतात. अशा वेळी ताजं सॅलड खाणे, तेही स्वत:च्या हाताने रुजवलेलं, म्हणजे किती कौतुक असेल त्यांना! त्यातल्या लेट्यूसची काही पानं गोठवून, मग पृथ्वीवर आणून त्यांचा अभ्यास झालेला आहे.

त्याशिवाय शून्य गुरुत्वाकर्षणात मासे पाण्यात कसे विहार करू शकतात, कीटक दिशा कशी समजून घेतात, मुंग्या कशा वागतात, आग कशी पसरते आणि कशी विझवायची, द्रवपदार्थ सांडले तर कसे पसरतात असे काही भन्नाट प्रयोगदेखील केवळ तिथेच होऊ शकतात!

असाच एक खास प्रयोग आहे जुळ्यांवरचा *'ट्विन स्टडी.'* स्कॉट आणि मार्क केली हे दोघे जुळे भाऊ दिसतात बरेचसे *सेम सेम* आणि त्यांनी काम करायचं ठरवलं, तेही एकाच ठिकाणी. नासामध्ये अवकाश संशोधनाचं. आहे ना कमाल? आणि त्याच्या या निर्णयामुळे पुढे एका खास

जरूर भेट द्या : वरदविनायक – महड, जि. रायगड – हेमाडपंथी मंदिर, उजव्या सोंडेची गणेशमूर्ती.

वार्षिक प्रायोजक – • 'संतुल'श्री. मिलिंद संत, पुणे • चि. अखिलेश संतोष काकडे, पुणे
• श्री. शैलेंद्र केशव म्हसकर, पुणे. सेंट्रल पेन्शनवर मोफत सल्ला (सायं.), पुरोहित, ज्ञान प्रबोधिनी ☎ २४४५१३१९

प्रयोगाची संधी आयती चालून आली.

स्कॉट आणि मार्क यांच्या शरीरातले डीएनए जवळजवळ एकसारखे आहेत. त्यातला स्कॉट २०१५ मध्ये आंतरराष्ट्रीय अवकाशस्थानकावर वर्षभर राहिला. त्याच काळात मार्क मात्र इथे पृथ्वीवर होता. स्कॉट परत आल्यावर त्याच्या डीएनएची चाचणी केली तर त्यांच्यामध्ये काही लहान बदल दिसून आले. पृथ्वीवर राहिलेल्या मार्कच्या डीएनएमध्ये हे बदल दिसले नाहीत. याचाच अर्थ असा, की हे बदल अवकाशात राहून आल्यामुळे झाले होते. मग पुन्हा एका वर्षाने स्कॉटच्या चाचण्या केल्या तर त्यातले काही बदल नाहीसे झाले होते. दर चाचणीच्या वेळी तुलना करायला मार्क होताच. त्यामुळे हा अभ्यास अगदी सर्व बाजूंनी परिपूर्ण होतो आहे. नासाचा हा *'ट्विन स्टडी'* पुढेही सुरू राहाणार आहे.

पृथ्वीवरून गेलेले अवकाशवीर तिथे राहतात तेव्हा आपल्या संशोधनात गर्क असतात. शिवाय पृथ्वीचं निरीक्षण करून ती माहिती निरनिराळ्या संशोधन संस्थांना पुरवत असतात. पण त्यातही वेळ काढून ते गंमतजंमत करून घेतात. खेळ, पार्टी, एकत्र चित्रपट बघणं, गाणी ऐकणं, असं काही ना काही तिथे सुरू असतं. जवळजवळ शून्य वजन असल्याने आपोआप होणाऱ्या उलटसुलट कोलांट्या, वेडेवाकडे उडणारे केस, खाताना होणारी भलतीच तारांबळ, असे त्यांचे *फोटो* आणि *व्हिडिओ* ते आवडीने *शेअर* करत असतात.

हे सगळं ऐकल्यावर आपल्यालाही या स्थानकावर जाऊन बघावंसं वाटतं ना?

आपल्या भारतातून अजून कोणी अवकाशस्थानकावर गेलेलं नाही. भविष्यात तिथे जाऊन कदाचित तुमच्यापैकी कोणी तो विक्रम करेल!

●●●

– डॉ. मेघाश्री दळवी
meghashri@gmail.com

अवकाशवीरांचा दिनक्रम जाणून घ्यायचाय तुम्हाला? मग पाहा ही चित्रफीत!

हसा हसा हसा...

पाहुणचाराची नवीन पद्धत

तुम्ही आलात फार छान वाटलं! बरं, तुम्ही काय घेणार? काढा की वाफ?

माहीत आहे का?

भारताचा राष्ट्रध्वज कसा तयार होतो?

भारताच्या राष्ट्रध्वजाची रचना श्री. पिंगली वेंकय्या या थोर स्वातंत्र्य सैनिकाने केली. राष्ट्रध्वज ९ वेगवेगळ्या आकारात बनवला जातो. त्याच्या उंची व लांबीचे प्रमाण २:३ आहे. सर्वात लहान ध्वज ४ × ६ इंच तर मोठा १४ × २१ फूट आहे. राष्ट्रध्वजासाठी लागणारे खादीचे कापड तयार करण्यासाठी फक्त हुबळी इथल्या कर्नाटक खादी ग्रामोद्योग संयुक्त संघालाच परवानगी आहे. पूर्वी मराठवाडा, बाराबंकी (उत्तरप्रदेश) व बानेथा (राजस्थान) यांनाही मंजूरी होती. ब्युरो ऑफ इंडियन स्टँडर्ड (बीस) यांनी घालून दिलेल्या नियमानुसारच आपला राष्ट्रध्वज तयार होतो.

ध्वजाचे कापड दोन भागात असते. एक 'बंटिंग क्लॉथ' – त्यापासून ध्वजाचे कापड तयार करतात तर 'डक क्लॉथ' पासून ध्वजाच्या डाव्या बाजूचा नेफा केला जातो. हे कापड तयार करण्यासाठी अगदी चरख्यापासून ते वेगवेगळ्या उच्चप्रतीची मशिनरी वापरून धागा किंवा सूत (यार्न) तयार करतात. बंटिंग क्लॉथसाठी ३० टेक्स्टचे (१००० मीटरमध्ये ३० ग्रॅम वजनाचे धागे) तर डक क्लॉथसाठी ३८ टेक्स्टचे (१००० मीटरमध्ये ३८ ग्रॅम वजनाचे धागे) लागतात. 'बीस'च्या नियमानुसार हे धागे आडवे व उभे हॅन्डलूम मशीनवर टाकून त्याचे कापड तयार करतात. ध्वजाची उंची व लांबी निश्चित केल्यावर तेवढ्या आकाराचे कापड कापून ते ब्लीच करतात. त्याचे तीन समान भाग करून एक गडद केशरी रंगाने, एक हिरव्या रंगाने रंगवतात तर पांढऱ्या कापडावर चोवीस आऱ्या असलेले गडद निळ्या रंगाचे अशोक चक्र छापतात. ते अशारितीने छापले जाते की कापडाच्या दोन्ही बाजूला अशोक चक्र दिसेल. केशरी, पांढरा, हिरवा अशी कापडे एकमेकांना त्या-त्या रंगाच्या धाग्यांनी जोडली जातात. नंतर डाव्या बाजूला नेफा बनवतात. ध्वजाच्या केशरी रंगाच्या बाजूला नेफ्याच्या बाजूला एक खुंटी अंबाडी या वनस्पतीच्या धाग्यानी घट्ट बांधतात. ही खुंटी हळदु, शिसम, साल किंवा साग वृक्षाच्या लाकडाचीच असावी लागते. 'बीस' पुन्हा एकदा सर्व तपासून 'आय. एस. आय.'चा शिक्का मारतं. राष्ट्रध्वजाला इस्त्री करून त्याची घडी अशारितीने घालतात की ध्वजाचा हिरवा भाग वर येतो.

●●●

जरूर भेट द्या : गिरिजात्मज - लेण्याद्री, जि. पुणे - लेण्यांमध्ये वसलेला, बिनखांबी मंडप रचना, दक्षिणमुखी मंदिर.

वार्षिक प्रायोजक - • श्री. क्षेत्रपालेश्वर टुरिस्ट, पुणे, ☎ ०२०- २४४५०९७५/९८२२०८९४६३
• डॉ. नीरज रायते, पुणे • श्री. संजय प्रधान, सातारा • सौ. स्मिता चावरे, नवी मुंबई

भारताचे राष्ट्रीय प्रतीक/चिन्ह

सत्यमेव जयते

भारताचा राष्ट्रीय ध्वज (तिरंगा) १५ ऑगस्ट, १९४७ साली स्वातंत्र्य मिळाल्यावर प्रथम फडकवला गेला. भारताचे राष्ट्रीय प्रतीक २६ जानेवारी, १९५० रोजी पहिल्या भारतीय प्रजासत्ताक दिनाच्या दिवशी स्वीकारले गेले.

भारताचे राष्ट्रीय चिन्ह तयार करण्याचे श्रेय स्वातंत्र्य सैनिक बदरूद्दिन तैयबजी व त्यांची पत्नी सुरैय्या यांना जाते. हे प्रतीक वाराणसी जवळच्या सारनाथ येथील सम्राट अशोकाने उभारलेल्या स्तंभाशी बरेचसे मिळते-जुळते आहे.

हे राष्ट्रीय प्रतीक स्तंभावर किंवा जाड तबकडीवर विराजमान केलेले आहे. यात तीन सिंह दिसतात. त्यापैकी एक सिंह समोर बघतो आहे तर बाकी दोन सिंह उजव्या व डाव्या बाजूला बघत आहेत. त्याखाली मध्यभागी २४ आऱ्या असलेले अशोकचक्र आहे. अशोकचक्राच्या डाव्या बाजूला घोडा तर उजव्या बाजूला बैल आहे. या खाली देवनागरी लिपीत 'सत्यमेव जयते' असे लिहिलेले आहे.

आशिया खंडात अस्तित्वात असलेल्या सिंहाचे प्रतीक भारताच्या राष्ट्रीय चिन्हात आहे. त्यातून ताकद/शक्ती, धैर्य, अभिमान, आत्मविश्वास मिळतो. घोडा इनामदारी, वेग, ताकदीचा संदेश देतो; तर बैल हा भक्कम कष्ट करण्याची प्रेरणा देतो. अशोकचक्रातले २४ आरे दिवसाचे २४ तास दर्शवतात, त्यातून असा संदेश मिळतो की काळाला ('काल') कोणीच लगाम घालू शकत नाही तो सतत पुढेच जात असतो. 'सत्यमेव जयते' म्हणजे 'फक्त सत्याचाच विजय होतो!'

भारताचे हे राष्ट्रीय प्रतीक फक्त शासकीय कामांमध्ये वापरता येते. भारतीय चलन, भारतीय पासपोर्ट (पारपत्रके), शासकीय लेटर हेड्स व काही शासकीय इमारतींवर लावण्याची परवानगी आहे. हे चिन्ह शासकीय राज्य व राष्ट्राध्यक्ष यांनाच फक्त अधिकारविषयक मुद्रा म्हणून वापरता येते. या राष्ट्रीय चिन्हावरूनच आंतरराष्ट्रात भारताची खरी ओळख मानली जाते.

मित्रांनो, तुम्ही अजून कोणती माहिती मिळवाल?

१. भारताच्या तिन्ही दलाची प्रतीके कोणती?
२. 'सत्यमेव जयते' हे पूर्वीच्या कोणत्या ग्रंथातून/पुराणातून भारताच्या राष्ट्रीय चिन्हावर घेतले आहे?
३. भारताचे राष्ट्रीय फूल, फळ, प्राणी, पक्षी कोणते?

●●●

संकलन- वाच. कांचनगंगा गंधे
४१/६६७ लोकमान्यनगर, पुणे 411030

‘‘अरे हे काय चाललंय *ग्रुपवर?*’’

‘‘काय झालं रे?’’

‘‘अरे पाहिलं नाहीस का तू? विकास आणि प्रगती कसले पेटलेत... *फुलऑन* भांडणं चालली आहेत!’’

‘‘विकास आणि प्रगती?? हे दोघं भांडतायेत? कमाल आहे!’’

‘‘*एक्झॅक्ट्ली!* म्हणजे हे दोघं समोर आले तर आयुष्यात कधी पाच वाक्यांच्यावर बोलत नाहीत आपल्याशी आणि त्यात ते एकमेकांशी कधी पाच वाक्य तरी बोलले असतील का, मला *डाऊट* आहे. आणि इथे मात्र निबंधच्या निबंध *टाईप* करत आहेत, ते सुद्धा कुठलातरी *पॉलिटिकल* मुद्दा उचलून.’’

‘‘खरंय. उद्या घेऊ त्यांना समोरासमोर. मजा येईल.’’

‘‘कसलं काय... मी सांगतो ते येणार नाहीत बघ समोर. कारणं देतील नुसती आणि टाळणार ते बोलायचं. हे असले जीव असतात ना, ते *मोबाईलवरच* एका फोटोमागून बोलू शकतात आणि तिथेच त्यांचं *फ्रस्ट्रेशन* निघतं. दे सोडून...’’

‘‘हां?? मी देऊ सोडून? अरे तूच फोन लावून मला सांगत बसला आहेस हे सगळं मगासपासून...’’

‘‘हां ते जस्ट मी तुला विचारत होतो तुला माहीत आहे का... चल ठेवतो मी फोन!’’

असंच काय काय तुम्ही सध्या बघत असाल ना तुमच्या आजूबाजूला? प्रगतीच्या मार्गावर विकास असेलच ना तुमच्याही ओळखीत एखाद्या

जाळ्यातून सुटायचं का?

– आदित्य महाजन



जरूर भेट द्या : **चिंतामणी** – थेऊर, जि. पुणे – पूर्वाभिमुख मूर्तीच्या डोळ्यात लाल मणी व हिरे जडवलेले आहेत.

वार्षिक प्रायोजक – • डॉ. विनायक देसूरकर, पुणे • डॉ. संजय गद्रे, धुळे • श्री. राहुल भिडे, पुणे • श्री. सचिन उल्हास गाडगीळ, पुणे • एक हितचिंतक, नाशिक – कै. केदारेश्वर आचवल स्मरणार्थ

ग्रुपवर? कधी कोणाचीतरी मोठ्ठी *पोस्ट* किंवा *मेसेजवर* सुरू झालेलं भांडण अजून पाच लोकांच्या *एंटरटेनमेंटचा* किस्सा बनून जातो, हे आपण सगळ्यांनीच अनुभवलंय. समोर आले की शांत, कधीही आपलं मत न मांडणारे, मत असलं तरी त्याची जबाबदारीने किंवा धाडसाने अंमलबजावणी आयुष्यात न करणारे, *फेसबुक-व्हॅट्सऍपवर* धुमाकूळ घालून मग पुन्हा समोर आले की, त्याच *मोबाईलमध्ये* घुसून बसलेली साधी भोळी शेळी होऊन जाणारे ह्यांची लोकसंख्या गेल्या ५-७ वर्षात अचानक वाढल्यासारखी वाटतीये नाही का?

खूप गोंडस नावं ह्याच बुद्धिजीवींनी त्यांच्या या वागण्याला दिली आहेत. सगळ्यात *कॉमन टर्म* आहे, *''इन्ट्रोव्हर्ट.''*

''आम्ही कमी बोलतो, आम्हाला लोकांशी संवाद साधायला काही आवडत नाही, सगळे लोक महामूर्खच असतात, त्यांच्याशी बोलणं म्हणजे *वेस्ट ऑफ टाइम.* आम्ही बरे आणि आम्ही वाचत असलेली *हाय-फाय* इंग्रजीमध्ये लिहिलेली एखादी कादंबरी बरी किंवा आम्हाला आमचा *इंटलेक्चुअलपणा* मिरवायचा म्हणून कुठलीतरी परदेशी *नेटफ्लिक्सवरची वेबसिरीज* बरी'' असे त्यांचे *सोशल मीडियावरचे अपडेट्स* तुम्हाला नेहमी दिसत असतात. मुळात *इन्ट्रोव्हर्ट* ह्या शब्दाचा त्यांनी पूर्ण अर्थच बदलून टाकलाय; पण अचानक यांची संख्या का वाढत आहे? *मोबाईल* आणि *इंटरनेटमुळे* का?

बरं, हे काय फक्त *हाय फंडा, टॉप कॉर्पोरेट कल्चरमध्येच* सापडणारे नमुने आहेत असं नाही बरं का! अगदी तुमच्यासारख्या शाळकरी मुलांमध्येही असे नमुने असतातच. आता मानवचंच बघा की. मानव सध्या नववीत शिकतोय. म्हणजे नावाला शिकतोय, बाकी जास्त तो उलटं शिकवतच असतो म्हणे. आज त्याला त्याचे तीन मित्र '*ग्राउंडवर* खेळायला येतोस का' असं विचारायला आले होते, तेव्हा मानवने मैदानी खेळ वगैरे सारखे अमानवी उद्योग कसे उपयोगाचे नाहीत, ह्या विचारांनी त्यांना नकार दिला आणि घरात बसून कुठलातरी *सॉलिड ग्राफिक्स* असलेला आणि प्रचंड *स्ट्रॅटेजिकली* खेळायचा, धडाम-ढिशुम - बंदुकांचा *गेम मोबाईलवर* खेळत बसला. त्यात म्हणे खूप ढासू *फिचर* आहेत, ज्याने तुम्ही *टीम* बनवून एकमेकांशी चॅट करत ह्या *गेममध्ये* पुढे जाता. आज म्हणे त्याच्या *टीममध्ये* साऊथ कोरियाचे पण ३ *प्लेयर* होते.

परवा आईने बळंबळं मानवला एका नातेवाईकाच्या लग्नात नेलं. तिथेसुद्धा आजूबाजूला इतके मानवप्राणी बघून मानवने बोलणं टाळलं. आईच्या *पर्समधून मोबाईल* घेऊन मागे कोपऱ्यात एका खुर्चीवर बसून मानव *युट्युबवर* काही शास्त्रातले अमानवी प्रयोग बघत बसला. त्याचीच एक २-३ वर्षांनी मोठ्ठी बहीण मस्त नट्टापट्टा करून तिच्या *मोबाईलमध्ये* वेगवेगळ्या *अँगलने सेल्फी* काढत होती. *हॅशटॅग 'माय सिस्टर गेट्स मॅरीड टुडे.' हॅशटॅग 'कान्ट कीप काल्म'* असं काय काय... ती बहिणीकडे आल्यापासून एकदाही न बोलता लिहून टाकत होती *इंस्टाला.* किती ती मानवी प्रगती नाही का? आमच्यावेळी आम्ही इतके वेंधळे... आम्ही खुर्च्या गोल मांडून गप्पा काय मारायचो, आणि सगळी मुलं कार्यालयाच्या गच्चीवर जाऊन विषामृत काय खेळायचो, आणि समारंभात सगळ्यांना पेढे वाटायचा हट्ट काय करायचो! अगदीच अतिसामान्य वृत्ती आयुष्य जगायची!

माझं शालेयजीवन २०१० मध्ये संपलं, तेव्हा आमच्या अख्ख्या वर्गात ४% मुलांकडे फक्त

मोबाईल होते. आणि साधारण पूर्ण वर्गात २ किंवा ४ अशी पूर्ण शांत आणि स्वतःमध्ये मग्न, खऱ्या अर्थाने *इन्ट्रोव्हर्ट* मुलं होती; पण आता शाळेत *मोबाईल* असला-नसला तरी घरी येताच आहेच ना *स्मार्टफोन* आणि इंटरनेटचं मोठं विश्व, मग कोणाशी सरळ समोरासमोर संवाद साधायची गरजच नाहीये. मग हीच शाळेतल्या *सो कॉल्ड इन्ट्रोव्हर्टसची* संख्या गेल्या १० वर्षात २-४% वरून २२-२५% वर आली आहे. हाच आकडा पुढे कॉलेज आणि ऑफिसमध्ये गेलात तर तिथे ४५-५०% स्वतःला *इंटलेक्चुअल इन्ट्रोव्हर्टस* म्हणून घेणारे सापडतील.

आता हे का होतं? ते आपण थोडं *हॅशटॅग सिम्पल रिसर्चने* जाणून घेऊयात. *सोशल मीडिया* ने *लाईक्स, व्ह्यूज, कमेंट्सचा* खेळ सुरू केला. 'ह्या ह्या मुलीला किंवा मुलाला २८० *लाईक्स* येतात म्हणजे हा भारी आहे, असा समज व्हायला लागला.' 'मी टाकलेल्या खतरनाक वाक्याला इतके *व्ह्यूज, लाईक्स* आणि *कमेंट्स* आल्या म्हणजे मी कसला *ऑसम* असणार' असं नेटवर खेळणाऱ्यांना वाटायला लागलं. *लाईक्स* आल्या तर तो एक मोठ्ठा आयुष्यातला *कॉन्फिडन्स बुस्टर* झाला आणि *लाईक्स* नाही मिळत हा न्यूनगंडाकडे नेणारा स्रोत तयार झाला. आता या *लाईक्स* आणि *सोशल मीडियावर अल्ट्रा कूल* राहायच्या शर्यतीत, आजच्या पिढीचा बराच वेळ, कष्ट आणि विचार त्याच दिशेने जायला लागले. ह्या नादात तेच विश्व होऊन गेलं. अगदी माझ्या जवळचं उदाहरण म्हणजे एका मोठ्ठ्या *मीडिया* कंपनीत काम करताना आमची एक सहल गोव्याला ठरत होती. ह्या सहलीला येऊन *रिलॅक्स* करणं, आनंद घेणं, मित्रांसोबत वेळ घालवणं ह्या सगळ्या आमच्या ऑफिसमधल्या मुलींच्यासाठी फार दुय्यम गोष्टी होत्या. तिथे जाऊन मला माझ्या *इंस्टाग्रामसाठी* असे फोटो काढायचेत, कमीत कमी १२०० *लाईक्स* आल्याच पाहिजेत, इतके वेगवेगळ्या कपड्यात - वेगवेगळ्या ठिकाणी मला फोटोज् काढायचेत की, पुढे २ महिने मला *पोस्ट* करता येतील. कित्ती बरं झालं मी त्या ट्रिपला नाही गेलो, नाहीतर माझ्या *फोटोग्राफी स्किल्सचा* सगळ्यांनी गैरफायदा घेतला असता!

थोडक्यात त्यांची *नॉर्मल* बोलायची, गप्पा मारायची किंवा काहीही न करता समुद्रकिनारी लाटांच्या आवाजात शांत बसण्याची आणि बरोबर आलेल्या व्यक्तींच्या सोबत शांततासुद्धा भरभरून *एन्जॉय* करायची मानसिकताच राहिली नाही. मी खूपदा फोनवर २-२ तास बोलतो आणि कधी ह्याचा उल्लेख झाला तर १० पैकी ८ लोकं मला विचारतात की, ''इतक्या वेळ कसं बोलू शकतोस कोणाशी? मी तर १० मिनिटांच्यावर कधीच जात नाही! कोणाशीतरी सलग इतकं बोलता येणं हे खरंच इतकं दुर्लभ झालंय का? हो.. नक्कीच झालंय!

जरूर भेट द्या : विघ्नेश्वर - ओझर, जि. पुणे - पूर्वाभिमुखमूर्तीच्या कपाळ व नाभीवर हिरे जडवलेले आहेत.

वार्षिक प्रायोजक - • सौ. प्राची व श्री. अमर परांजपे - सांगली • सौ. मानसी मराठे, पुणे
• सौ. किरण मुसळे - कुलकर्णी, सातारा • श्री. अनिल रिसबूड, पुणे • श्री. किशोर पंडित, चेंबुर, मुंबई

लपून वार करणं सोप्पं. म्हणूनच काहीही बोलू शकतो. बोलायचं नसेल तर हवं तेव्हा *ऑफलाईन* जाणं, एखाद्याला *रिप्लाय* द्यायचा तर लगेच द्यायची गरज नसणं, *रिप्लाय* खूप विचार करून १५ मिनिटांनी टाकायची मुभा असणं, अशी अनेक लोकं सोशल मीडियावर ''मित्र'' असणं जी कधीच समोर येणार नाहीयेत. ज्यांना छान बोला, वाईट बोला, त्यांच्यावर टीका करा, त्यांना *ट्रोल* करा काहीही फरक नाही पडत.

ह्यांना बोलायचं नसलं की ह्यांच्याकडे हजार कारणं! तीही समोरच्याला कमीपणा देणारी. आणि आपण कोणीतरी विशेष आहोत हे दर्शवणारी!!

''मला इतक्या फालतू गोष्टींवर बोलायला/ वाद घालायला वेळच नाही,''इ.इ. ''ह्याहून खूप बेटर गोष्टी आहेत माझ्याकडे करायला,''

''माझ्या वेळेप्रमाणे तुम्ही कधीच *अ‍ॅड्जस्ट* करत नाही त्याला मी काय करणार?'',

''माझं तुम्ही कधी तसंही ऐकून घेत नाही, आज काय वेगळं?'' अशांसारखी वाक्य ते नेहमी वापरतात आणि संवाद टाळतात. त्याला जोड भरपूर कारणांची असते. सगळ्यात *फेमस* कारण म्हणजे ''आपण आज नको बोलायला, माझा मूड नाहीये. मी वेगळ्या *झोनमध्ये* आहे जरा आज.''

ह्या मंडळींना ओळखा, त्यांना माणसात आणा, थोडंसं त्यांचं बोलणं, राग, *अनकंफर्टनेस*, तुसडेपणाने वागणं सहन करा. कारण हा सुद्धा एक कोरोनासारखा साथीचा रोग आहे. ही *इंटलेक्चुअल इन्ट्रोव्हर्टसची* संख्या जर का वाढत राहिली, तर एक दिवस आपल्यालासुद्धा कोणीच बोलायला, मन मोकळं करायला, दंगा मस्ती करायला राहणार नाही आणि सगळेच *मोबाईल-इंटरनेटवर* पडीक आहेत, त्यावरच बोलतात म्हणून आपल्याला सुद्धा त्याच दिशेला वळायला लागेल. मग आपल्याला सुद्धा जे मनमुराद गप्पा मारतात, मोबाईल - पुस्तकं - *वेबसिरीज* यापलीकडे आयुष्य छान जगतात, मजा करतात ह्यांचा तिरस्कार वाटायला लागणार; कारण आपल्या आजूबाजूच्यांकडे आपल्यासाठी वेळ नाही. ते तर मोबाईलमध्येच! कालांतराने आपल्या आजूबाजूच्यांच्यासोबत संबंध ठेवण्यासाठी आपणही तसेच होत जातो, ते सुद्धा नकळत. आपणही मोबाईलवर जास्त वेळ घालवतो, समोरासमोर बोलणं टाळतो आणि सोशल मीडियावर भांडतो आणि जग कसलं फालतू आहे असं म्हणून *फ्रस्ट्रेट* होतो. हा खूप महत्त्वाचा मुद्दा आहे. स्वतःला *इंटलेक्चुअल इन्ट्रोव्हर्ट* होऊ देऊ नका देऊ. त्यापेक्षा बावळट, मनमुराद जगणारा आणि *सोशल मीडियावर* भयानक आणि अभ्यासपूर्ण मतं न देणारा, टिंगल टवाळक्या करणारा आणि गप्पिष्ट असा *एक्सट्रोव्हर्ट* व्हा! जास्ती *स्कोप* आहे त्यात आनंदी राहायचा. आणि हा आनंद टिकवण्यासाठी चांगली मैत्री करा, बोलके लोक जोडून आणि अबोल्यांना चिमटे काढून-ओढून बोलकं करायचा प्रयत्न करा.

टीप : जमलं तर हा लेख वाचून झाल्यावर संदीप खरे लिखित - ''मी हजार चिंतांनी हे डोके खाजवतो'' ही कविता जरूर वाचा.

•••

- आदित्य महाजन

mahajanadi333@gmail.com

आपल्यामध्ये असणाऱ्या सकारात्मक आणि नकारात्मक वृत्तींचं दर्शन घडवलंय संदीप खरे यांनी केलेल्या त्यांच्या कवितेच्या सादरीकरणातून!

स्वयं शोध चाचणी ५– समय नियोजन कौशल्य – १

या चाचणीतील प्रश्नांचे उत्तर देताना, नेहमीच /कधीतरी /क्वचित /कधीच नाही यांपैकी कोणतातरी एक पर्याय निवडा आणि त्यासाठी खालील गुण देण्याच्या पद्धतीनुसार त्या प्रश्नांपुढे गुण द्या. हे काम प्रामाणिकपणे करा.

प्रश्न	गुण देण्याची पद्धत – नेहमीच – ४ , कधीतरी – ३, क्वचित – २ , कधीच नाही – १	गुण
१. दिवसातल्या २४ तासांचा हिशोब मी मांडते/मांडतो का?		
२. कोणकोणत्या गोष्टींवर दिवसातला माझा सरासरी किती वेळ जातो याचे भान मला असते का?		
३. कोणत्या गोष्टींवर किती वेळ द्यायला हवा याबाबत माझ्या मनात स्पष्टता असते का?		
४. माझ्याकडून जी कामे झाली पाहिजेत असें मला वाटते त्याची मी यादी करते/करतो का?		
५. त्यातील जी कामे जास्त महत्त्वाची आहेत ती करायला मी प्राधान्य देते/देतो का?		
६. दिवसभरात ज्या अनावश्यक गोष्टींवर वेळ जातो असे मला वाटते त्या कमी करण्याचा प्रयत्न मी करते/करतो का?		
७. ठरवल्याप्रमाणे गोष्टी करण्यासाठी मी निश्चयपूर्वक आग्रही असते/असतो का?		
८. वेळेचा सदुपयोग झाला पाहिजे याबाबत मी आग्रही असते/असतो का?		
९. मी ठरवलेल्या गोष्टी करताना मित्रमैत्रिणींनी मौजमजेसाठी बोलावल्यास मी ठामपणे नकार देऊ शकते/शकतो का?		

एकूण

वरील चाचणी सोडवून गुणांची बेरीज करा. तुमचे समय नियोजन कौशल्य वाढवण्यासाठी तुम्हाला मिळालेल्या गुणांनुसार पुढे काही कृती करायला सुचवल्या आहेत, त्या अवश्य करा.

१८ पेक्षा कमी गुण – रोज रात्री झोपण्यापूर्वी आधीच्या २४ तासांचा हिशोब मांडायचा प्रयत्न करा. कोणत्या गोष्टी केव्हा केल्या, त्यात किती वेळ गेला हे नोंदवा. असे ८ दिवस करा.

१८ ते २७ मधील गुण – वेळेचा नियोजनपूर्वक वापर करणाऱ्या २ व्यक्तींची मुलाखत घ्या व ते त्यांना कसे जमते याबद्दल त्यांच्याशी बोला.

२७ पेक्षा जास्त गुण – कोणत्या अनावश्यक गोष्टींवर वेळ जातो त्याची यादी करा. त्यातली एक तरी गोष्ट न करण्याचा प्रयत्न करा. काही अनावश्यक गोष्टींवरील वेळ कमी करण्याचा प्रयत्न करा.

प्रतिसादी वाचकवीर व्हा... (वर्ष २०/११)

हा अंक वाचा... प्रश्नांची उत्तरे लिहून पाठवा... आणि बक्षीस मिळवा...

या अंकातील प्रश्नांची उत्तरे दि. ३० सप्टेंबर २०२० पर्यंत 'छात्र प्रबोधन'कडे पाठवा. बक्षीस जिंकण्याची प्रत्येकाला संधी! या निमित्ताने तुम्ही अंक बारकाईने वाचाल व अंकातील साहित्याचा अधिक आनंद मिळवाल, असा विश्वास आहे.

प्रश्नांची उत्तरे लिहा –

१) आजी-आजोबांची आगळी-वेगळी बँक कोणती? आणि त्या बँकेचे वैशिष्ट्य काय आहे?
२) कवीने कवितेत खेड्यातील निसर्गाचे वर्णन कसे केले आहे?
३) अवकाशस्थानकावर अन्नधान्य पिकवण्याच्या बाबतीत आत्तापर्यंत कोणते प्रयोग केले गेले?
४) 'गप्पिष्ट एक्स्ट्रोव्हर्ट व्हा' असं लेखक का सुचवतो? (लेख – जाळ्यातून सुटायचं का?)
५) भारताचे राष्ट्रीय प्रतीक स्तंभावर असलेले सिंह कशाचं प्रतीक दर्शवतात?

हे मासिक ज्ञान प्रबोधिनी या संस्थेच्या मालकीचे असून मुद्रक, प्रकाशक व संपादक
श्री. महेन्द्र सेठिया यांनी राष्ट्रीय सौर २९ श्रावण, शके १९४२, २० ऑगस्ट २०२०
ज्ञान प्रबोधिनी, ५१०, सदाशिव पेठ, पुणे – ३० येथून प्रसिद्ध केले.

भारताच्या स्वातंत्र्यलढ्यात मोलाचं योगदान देणाऱ्या या क्रांतिकारकांना ओळखा...



वरीलपैकी किमान दोन क्रांतिकारकांची माहिती जरूर मिळवा.

सौर श्रावण, शके १९४२/ऑगस्ट २०२० पंजीकृत नियतकालिक, ISSN 2279 - 0691 Chhatra Prabodhan
प्रकाशन दिनांक : सौर २९ श्रावण, शके १९४२/२० ऑगस्ट २०२०
पंजीकरण क्रमांक (RNI NO.) MAHMAR /2000/5636 घोषणापत्र क्रमांक : (SDM/Pune/SR/139/2017)
टपालाने सवलतीच्या दरात पाठविण्याचा परवाना क्रमांक : PCW/050/2018-2020
Date of posting : On 1st day of every month, At the Post office S. P. college, Pune - 30. Date of publication : 20-8-2020



हे प्रकाशचित्र लडाख येथील आहे. Nikon Coolpix या कॅमेऱ्याने टिपले आहे.

– मानस कुलकर्णी, mp.kulkarni25@gmail.com

सौर दिनदर्शिका शके १९४२

	ऑगस्ट २०२०	श्रावण भाद्रपद
श.	1	श्रा.१०
र.	2	११
सो.	3	१२
मं.	4	१३
बु.	5	१४
गु.	6	१५
शु.	7	१६
श	8	१७
र.	9	१८
सो.	10	१९
मं.	11	२०
बु.	12	२१
गु.	13	२२
शु.	14	२३
श.	15	२४
र	16	२५
सो.	17	२६
मं.	18	२७
बु.	19	२८
गु.	20	२९
शु.	21	३०
श.	22	३१
र.	23	आ. १
सो.	24	२
मं.	25	३
बु.	26	४
गु.	27	५
शु.	28	६
श.	29	७
र.	30	८
सो.	३१	९

सभासदांनी आपले व्हॉटस् ॲप संपर्क क्रमांक कळवले नसल्यास ९८५००३५३९८ या भ्रमणभाषवर लवकरात लवकर कळवावे. म्हणजे सभासदांशी संपर्क साधता येईल.

सौर दिनदर्शिकेचा वापर जरूर करा.

संपर्क पत्ता :
छात्र प्रबोधन, ज्ञान प्रबोधिनी
५१० सदाशिव पेठ, पुणे 411030
☎ (020) 24207 174/175
www.chhatraprabodhan.org
ई-मेल : chhatraprabodhan@jnanaprabodhini.org

या अंकाची किंमत : ₹ २०
वार्षिक वर्गणी : ₹ २००

प्रिय पोस्टमन,

कोरोनाच्या संकटकाळातही जोखीम पत्करून हा अंक तुम्ही आमच्या लाडक्या मुलामुलींपर्यंत पोहोचवून फार मोठं काम करत आहात. मुलंमुली या मासिकाची फार आतुरतेने वाट पाहात असतात. मासिक वेळेवर मिळाले नाही अथवा मिळालेच नाही तर ती नाराज होतात, त्यांचा तुमच्यावरचा अन् आमच्यावरचाही विश्वास कमी होतो. असं झालेलं तुम्हालाही निश्चितच आवडणार नाही. हो ना !

तेव्हा हे मासिक खात्रीशीरपणे, विनाविलंब शेजारच्या (→) पत्त्यावर द्यावे.

तुम्ही सुरक्षित राहावे ही प्रार्थना व सर्वतोपरी काळजी घ्यावी, ही आपुलकीच्या नात्याने विनंती!

तुमचा-संपादक, छात्र प्रबोधन